श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-६, अंक-१० | ऑक्टोबर-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## डेरवण क्रीडासंकुलात 'बी. के. एल. वालावलकर क्रॉसकंट्री स्पर्धा'

दिनांक ६ सप्टेंबर २०१८ रोजी डेरवण येथील 'एसव्हीजेसीटी' क्रीडासंकुलामध्ये सलग तिसऱ्या वर्षी जिल्हास्तरीय भव्य 'बी. के. एल. वालावलकर क्रॉसकंट्री स्पर्धा' जल्लोषात पार पडल्या. या स्पर्धेत १२, १४, १६ आणि १८ वर्षे अशा वयोगटात १५०० मुले आणि मुलींनी उत्साहाने सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय व्हॉलिबॉल प्रशिक्षक श्री. देविदास जाधव यांच्या हस्ते झाले. या वेळी प. पू. श्री काका महाराज जोशी, छत्रपती पुरस्कार विजेते श्री. सुमंत वाईकर, रत्नागिरी जिल्हा संघटनेचे श्री. संदीप तावडे, मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील, शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. विजय डोम्बले, यु.के.स्थित मानसशास्त्रज्ञ सौ. शर्मिला कानविंदे, आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील विविध गटातील पहिल्या पाच क्रमांकांच्या खेळाडूंना एकूण पन्नास हजार रुपयांची रोख पारितोषिके, पदके आणि प्रमाणपत्रे देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.




*प्रमुख पाहुणे श्री देविदास जाधव यांचा श्रीकाकामहाराज जोशी यांच्या हस्ते सत्कार, सोबत श्री. सुमंत वाईकर डॉ. अरविंद यादव, श्रीकांत पराडकर आदी*




*डेरवण क्रीडासंकुलात 'बी. के. एल. वालावलकर क्रॉसकंट्री स्पर्धा'*

प्रतिवर्षी अधिकाधिक लोकप्रिय होत असलेल्या या स्पर्धेत डेरवण, चिपळूण, दापोली, हर्णे, करजुवे, करंजनी, धामणसे, लांजा, खंडोत्री-अबीटगाव, निवळी, संगमेश्वर, कोसंबी-फुरूस, गुहागर, असुर्डे-आंबतखोल, कामथे, पाचाड-शिरळ, रामपूर, मिरजोळी, पोसरे, आबलोली, कोळबांद्रे, दहिवली, रत्नागिरी येथील विविध शाळांमधून आलेल्या १५०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धे दरम्यान देण्यात आलेल्या टी-शर्ट व टोप्या परिधान केलेल्या १५०० स्पर्धकांमुळे संकुलातील वातावरण बहरून गेले होते. स्पर्धेदरम्यान देण्यात येणाऱ्या तात्काळ सेवा, वैद्यकीय सुविधा आणि खेळाडूंना दिला जाणारा अल्पोपहार यांचे क्रीडाप्रेमी व्यक्तींनी कौतुक केले.



*डॉ. नेताजी पाटील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करताना*

या स्पर्धेतील पार्थ चौगुले, दिया मोहिते, दर्शन रामगाडे, पौर्णिमा निवाते, सिद्धेश बर्जे, साक्षी जड्याळ, सिद्धेश कानसे, सेजल पडवळ या स्पर्धकांनी आपापल्या गटात विजेतेपद पटकावले. तसेच हर्णे स्पोर्ट्स क्लब-आबलोली, माध्यमिक विद्यालय-धामाणसे, येथील खेळाडूंनी उत्तम कामगिरी केली. अतिशय ग्रामीण भागातून येणाऱ्या या खेळाडूंमध्ये विजयासाठी मोठी चुरस होती. ही चुरस पाहण्यासाठी अनेक क्रीडाप्रेमी संकुलात उपस्थितीत होते.

याप्रसंगी स्पर्धेचे प्रमुख पाहुणे श्री. देविदास जाधव यांनी ग्रामीण भागातील खेळाडूंना अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संकुलात खेळण्याची संधी मिळते हे भाग्याचे आहे तसेच या संकुलातून निश्चितच ऑलिम्पिक खेळाडू घडेल आणि देशाचे नाव उज्ज्वल करेल असे विचार आपल्या मनोगतात व्यक्त केले आणि संकुलाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



*पारितोषिक वितरण करतांना विजेत्यांसमवेत श्रीकाकामहाराज जोशी, सौ. शर्मिला कानविंदे आणि श्रीकांत पराडकर*

## डेरवण रुग्णालयातील अत्याधुनिक रोगनिदान यंत्रणा

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर रुग्णालय रोगनिदान व संशोधन केंद्र, ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, तसेच नर्सिंग कॉलेज ही वैद्यकीय उपचार, प्रशिक्षण आणि संशोधनाची महत्त्वाची केंद्रे आहेत. आधुनिक उपचार पद्धतीत रोगनिदानासाठी विविध प्रकारच्या अत्याधुनिक यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. या नव्या यंत्रांमुळे आणि तंत्रामुळे रोगनिदानात अधिक अचुकता आली आहे. सर्व प्रकारच्या रोगनिदान परीक्षा एकाच ठिकाणी झाल्यास रुग्णाच्या दृष्टीने ते सोयीचे ठरते आणि डॉक्टर्सनाही निदान त्वरीत करता येते. त्या दृष्टीने डेरवण रुग्णालयात सर्व प्रकारची अद्ययावत मशिनरी बसविण्यात आलेली आहे. त्यातील काहींची माहिती पुढे देत आहोत.

**१) अद्ययावत ग्रॉसिंग स्टेशन -**




हिस्टोपॅथॉलॉजी विभागामध्ये आलेल्या बायॉप्सीचे परिक्षण करून त्यातील संशयास्पद असलेला भाग वेगळा केला जातो. या भागावर पुढे अनेक रासायनिक प्रक्रिया करून सूक्ष्मदर्शकाखालील निरीक्षणास तयार केला जातो.

**२) ऑटोमॅटिक टिश्यू प्रोसेसर -**



रोगनिदानासाठी काढलेल्या बायॉप्सीच्या तुकड्यातील पाणी रासायनिक प्रक्रियेद्वारे काढून तो पॅराफिन वॅक्समध्ये मुरविला जातो. त्यामुळे त्याच्यापासून वॅक्स ब्लॉक बनविणे सोपे जाते. त्या तुकड्यात पाणी राहिल्यास तो कुजून नष्ट होतो. तसे होऊ नये यासाठी या मशिनचा उपयोग होतो.

**३) ऑटोमॅटिक एंबेडिंग मोड्युल -**



बायोप्सीचे तुकड्यापासून या मशिनद्वारे वॅक्स ब्लॉक तयार होतो. या वॅक्स ब्लॉकचा तुकडा सूक्ष्मदर्शकाखाली पाहण्यासाठी स्लाईड तयार केली जाते.

**४) ॲटोमॅटिक मायक्रोटोम –**



सदर अद्ययावत मशिन वॅक्स ब्लॉकचा अतिशय पातळ असा तुकडा (स्लाईड) स्वत:हून तयार करते. त्यामुळे कॅन्सरचे निदान होण्यास मदत होते.

**५) ॲटोमॅटिक स्लाईड स्टेनर –**



रासायनिक प्रक्रियेद्वारे सेक्शनला विविध रंगछटा निर्माण करून या तंत्रज्ञानाने सूक्ष्मदर्शकाखाली पाहण्यायोग्य बनवून निदान करणे सुलभ केले जाते.

**६) ॲटोमॅटिक इम्युनो हिस्टो–केमिस्ट्री (आय.एच.सी.) ॲनालायझर –** या प्रगत तंत्रज्ञानाने सेक्शनला सूक्ष्मदर्शकाखाली पाहण्यासाठी रासायनिक प्रक्रियेद्वारे ॲन्टिबॉडीजचा वापर करून विविध रंगछटा निर्माण करून शोधकार्य सुलभ केले जाते.



**७) ऑटोमॅटिक कव्हरस्लिपर –**



स्लाईडवरील अवयवाचा तुकडा (सेक्शन) अनेक वर्षे टिकवून ठेवण्यासाठी त्यावर कव्हरस्लिप लावणे आवश्यक असते. ज्यामुळे या स्लाईडवर ठेवलेल्या बायोप्सीचे वर्षानुवर्षे जतन केले जाते. त्यामुळे रोगनिदान व संशोधन करण्यास मदत होते.

**८) पेंटाहेड सूक्ष्मदर्शक यंत्र –**



तपासणीसाठी तयार असलेल्या स्लाईडचे एकाच वेळी पाच व्यक्ती या सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे निरीक्षण करू शकतात व इतरांनाही या तपासणीबाबत प्रशिक्षण देता येते.

**९) डेकाहेड सूक्ष्मदर्शक यंत्र –**



तपासणीसाठी तयार असलेल्या स्लाईडचे एकाच वेळी दहा व्यक्ती या सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे निरीक्षण करू शकतात व इतरांनाही या तपासणीबाबत प्रशिक्षण देता येते.

**१०) डिजिटल स्कॅनर –**



तयार झालेल्या बायोप्सी स्लाईड्स स्कॅन केल्या जातात. स्कॅन केलेल्या स्लाईड्स दुसऱ्या अनुभवी पॅथॉलॉजिस्टकडेही पाठविता येतात. याद्वारे कठीण रोगाचे मायक्रोस्कोपिक निदान करणे सोईचे होते.

**११) सेल काऊंट ॲनालायझर –**



विविध रक्तपेशींचे प्रमाण शोधले जाते. शोधलेल्या रक्तपेशींच्या प्रमाणाचा वेगवेगळ्या आजारांच्या निदानासाठी उपयोग केला जातो.

**१२) कोॲग्युलोमीटर –**



रक्त गोठण्यासाठी लागणाऱ्या घटकांचे प्रमाण मोजले जाते. सर्पदंश, कांही आनुवंशिक आजार व कांही औषधांच्या डोसांचे प्रमाण ठरविण्यासाठी याचा उपयोग होतो.

**१३) ई. एम. जी. (स्नायू व मज्जारज्जू तपासणी)**



स्नायू व मज्जारज्जू यांना विजेचा सौम्य धक्का देऊन त्यांची हालचाल मोजणे व त्याद्वारे हातापायाच्या स्नायूंची कार्यक्षमता तपासण्यासाठी याचा वापर होतो

## डेरवण प्रशालेचे विविध क्रीडा स्पर्धांमध्ये नेत्रदीपक यश

महाराष्ट्र राज्य क्रीडा संचालनालय, पुणे व रत्नागिरी जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्यावतीने आयोजित विविध तालुकास्तरीय जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये डेरवण प्रशालेने घवघवीत यश संपादन केले.

**खेळ – सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा**

स्पर्धा ठिकाण – पोलीस परेड मैदान, रत्नागिरी

| अ.क्र. | वयोगट | प्रावीण्य |
|---|---|---|
| १ | १४ वर्षे मुले | विजयी संघ (विभागीय स्पर्धेसाठी निवड) |

**खेळ – शालेय बॅडमिंटन स्पर्धा (तालुकास्तरीय)**

स्पर्धा ठिकाण – एस.व्ही.जे.सी.टी. स्पोर्ट्स अकॅडमी

| अ.क्र | वयोगट | विद्यार्थ्याचे नाव | प्रावीण्य |
|---|---|---|---|
| १ | १४ वर्षे | कु.अपराजिता आदर्श | विजयी (जिल्हा स्पर्धे साठी निवड) |

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

**खेळ – शालेय फुटबॉल स्पर्धा (जिल्हास्तरीय)**
स्पर्धा ठिकाण – एस.व्ही.जे.सी.टी. स्पोर्ट्स अकॅडमी

| अ.क्र. | वयोगट | प्रावीण्य |
|---|---|---|
| १ | १४ वर्षे मुले | विजयी संघ (विभागीय स्पर्धेसाठी निवड) |
| २ | १७ वर्षे मुले | विजयी संघ (विभागीय स्पर्धेसाठी निवड) |
| ३ | १९ वर्षे मुले | तृतीय क्रमांक |

**खेळ – मल्लखांब,** स्पर्धा ठिकाण – पाग व्यायाम शाळा, चिपळूण

| क्र. | वयोगट | विद्यार्थ्यांचे नाव | प्रावीण्य | |
|---|---|---|---|---|
| १ | १४ वर्षे मुले<br>१४ वर्षे मुली | १. साई धनावडे<br>२. त्रिवेणी सुर्वे<br>३. स्वरा गुजर | प्रथम क्र.<br>प्रथम क्र.<br>द्वितीय क्र. | सर्व खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड |
| २ | १७ वर्षे मुले | १.निहाल विचारे | प्रथम क्रमांक | विभागीय स्पर्धे साठी निवड |
| ३ | १९ वर्षे मुले | १. तेजस धनावडे | तृतीय क्रमांक | विभागीय स्पर्धे साठी निवड |

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून ऑक्टोबर २०१८ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०६ ऑक्टोबर | डॉ. भारती खांडेकर, मुंबई (प्लॅस्टीक सर्जन) | दुभंगलेले टाळ व ओठ शस्त्रक्रिया तज्ज्ञ |
| १९/२० ऑक्टोबर | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| २० ऑक्टोबर | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २० ऑक्टोबर | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग तज्ज्ञ |
| १३,१४ऑक्टोबर | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन) | भाजलेले व्रण, डाग; शस्त्रक्रिया व उपचार |
| २१ ऑक्टोबर | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ व उपचार |
| २१ ऑक्टोबर | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| २१ ऑक्टोबर | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |
| | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट) | पोटाचे विकार |
| | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रूग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**

**डोहाळेजेवण व सासू सून मेळावा –** ३० ऑक्टोबर – वालावलकर रुग्णालय येथे, २६ ऑक्टोबर – RHTC येथे
**सहा महिन्यांचे वाढदिवस –** १७ ऑक्टोबर – RHTC येथे, २६ ऑक्टोबर – वालावलकर रुग्णालय येथे । **सरपंच मेळावा –** २२ ऑक्टोबर

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर